# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय,
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे – ४११००१

फोन नं.- ०२०२६०५०६४१ ई मेल – sceapune@gmail.com


---

जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-१०/कलम ७३ अअअ (५)/रिक्त जागा/२०१५/ ७९५२ दिनांक: १९/९/२०१५.

**परिपत्रक**

**विषय** :- नैमित्तीक रिक्त जागा व निवडणूकीदरम्यान रिक्त राहणाऱ्या जागा यातील मुलभूत फरक विचारात घेऊन निवडणूकीदरम्यान रिक्त राहणाऱ्या जागा भरणे बाबत...

आपले लक्ष वरील विषयाकडे वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना कळविण्यात येते की, नैमित्तीक रिक्त जागा व निवडणूकीदरम्यान रिक्त राहणाऱ्या जागा यातील मुलभूत फरक विचारात न घेता निवडणूकीनंतर समिती गठीत झाल्यावर निवडणूकी दरम्यानच रिक्त राहणाऱ्या पदांना नैमित्तिक रिक्त जागा संबोधून नियम ७४ अन्वये भरणे बाबतचे प्रस्ताव संबंधीत संस्थांकडून व आपल्या मार्फत शिफारशीसह प्राधिकरणास प्राप्त होत आहेत.

त्या अनुषंगाने आपले लक्ष वेधण्यात येत आहे की, महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१४) नुसार प्रत्येक संस्थेस तीच्या समितीमध्ये किंवा पदाधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेली कोणत्याही नैमित्तिक रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास कळविणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७४ मध्ये नैमित्तिक रिक्त पदे कोणती आहेत याबाबत स्पष्ट तरतुद आहे. त्यानुसार

१. मृत्युमुळे रिक्त होणारी जागा
२. राजीनाम्यामुळे रिक्त होणारी जागा
३. अपात्रता अथवा निष्कासनामुळे रिक्त होणारी जागा
४. समिती सदस्याच्या कामकाज करण्यास असमर्थ होण्यामुळे रिक्त झालेली जागा

या चार प्रकारच्या कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागा याच केवळ नैमित्तिक रिक्त जागा असून सदर जागा भरणे बाबत अधिनियम व नियमात संदिगधता आहे. त्यामुळे सदयस्थितीत सदर जागा भरण्याची कार्यवाही स्थगीत आहे.

तथापि, निवडणूकीदरम्यान एकुण समिती सदस्य संख्येच्या २/३ पेक्षा अधिक जागा निवडून आल्यानंतर व समितीचे गठण झाल्यानंतर पात्र उमेदवार उपलब्ध न होणे व निवडणुक प्रक्रियेमध्ये उमेदवारांनी अर्ज मागे घेणे या कारणांमुळे ज्या जागा निवडणूक न होता रिक्त राहतात त्या जागा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (५) मधील तरतुदीन्वये निवडणूकीद्वारे भरणे अनिवार्य आहे. निवडणूकीसाठी नियुक्त केलेले निवडणूक निर्णय अधिकारी यांनी या बाबत त्वरेने कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशा निवडणूकीसाठी निवडणूक नियमातील तरतुदी जश्याच्या तश्या लागु असल्यामुळे कोणत्याही मागदर्शनाची अपेक्षा न करता अशा रिक्त जागा भरणे बाबत कार्यवाही संबंधीत जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावी.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशाने.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)